**मुख्य कार्यालय, विरार**
**विरार (प),**
**ता. वसई, जि. पालघर, पिन 401 303.**

**दुरध्वनी : 0250-2525105/06/2529888/2529890**
**फॅक्स : 0250-2525107**
**ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com**

**जावक क्र. : व.वि.श.म./ /**
दि.२०/०८/२०२६

**सर्वेक्षण करण्यात आलेल्या फेरीवाल्यांना मिळणार ओळखपत्र;महानगरपालिकेच्या प्रभाग समिती कार्यालयांमार्फत होणार पडताळणी ;फेरीवाल्यांनी प्रभाग समिती कार्यालयात कागदपत्र सादर करण्याचे आवाहन**

सन २०१४ मध्ये केंद्र सरकारने The Street Vendor Act (Livelihood and Regulation of Street Vending Act 2014) लागू केला आहे. याचा मुख्य उद्देश फेरीवाल्यांच्या (पथविक्रेत्यांच्या) उपजीविकेचे संरक्षण आणि शहरातील फेरीविक्रीचे नियमन या दोन गोष्टींचा समतोल साधणे आहे. हा कायदा दि.०३ जून २०१४ पासून लागू झाला. त्यान्वये वसई विरार शहर महानगरपालिकेमार्फत सन २०१५ मध्ये शहरातील फेरीवाल्यांचे सर्व्हेक्षण करण्यात आले व सर्वेक्षणाअंती १५२१५ एवढी फेरीवाल्यांची संख्या निश्चित करण्यात आली होती.

सन २०१५ च्या सर्वेक्षणानुसार निश्चित करण्यात आलेल्या फेरीवाल्यांना महानगरपालिकेमार्फत ओळखपत्र देण्याचे काम महानगरपालिकेच्या प्रभाग समिती कार्यालयांमार्फत दि.०१ सप्टेंबर २०२६ पासून सुरु करण्यात येत असून महानगरपालिकेच्या माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत उपलब्ध करून देण्यात आलेल्या संगणक प्रणालीमध्ये संबंधित फेरीवाल्यांची आवश्यक माहिती व कागदपत्रे अद्ययावत करून त्यानुसार ओळखपत्र तयार करण्याचे काम करण्यात येणार आहे.

सर्वेक्षणानुसार निश्चित करण्यात आलेल्या फेरीवाल्यांची माहिती महानगरपालिकेच्या सर्व प्रभाग समिती कार्यालयांना उपलब्ध करून देण्यात आलेली असून त्यानुसार सर्वेक्षणातील पात्र/संबंधित फेरीवाल्यांनी पडताळणीकरीता आवश्यक कागदपत्रे संबंधित प्रभाग कार्यालयांमध्ये सादर करावीत. आवश्यक कागदपत्रांमध्ये फेरीवाला व्यवसायाच्या ठिकाणाचा फोटो, व्यवसाय करीत असलेल्या ठिकाणाचे Location/GPS Coordinates, आधार कार्ड, रहिवासी दाखला, पासपोर्ट साईजचे दोन फोटो व इतर कागदपत्रे संबंधित फेरीवाल्यांनी सादर करावीत.

आवश्यक कागदपत्रे प्राप्त झाल्यानंतर संबंधित अधिकारी कागदपत्रे व सर्वेक्षणातील माहिती तपासतील. त्यामध्ये त्रुटी किंवा अपूर्ण माहिती आढळल्यास फेरीवाल्यांकडून आवश्यक दुरुस्ती/कागदपत्रे मागवण्यात येतील. यानंतर सदर प्राप्त कागदपत्रांच्या आधारे पडताळणी पुर्ण झाल्यानंतर ते जिथे व्यवसाय करतात त्या ठिकाणाचे सर्वेक्षण करण्यात येईल. सदर प्रक्रिया योग्यरीत्या पार पडल्यानंतर पात्र फेरीवाल्यांचा Unique ID तयार करण्यात येईल व त्यानंतर सदर पात्र फेरीवाल्यांचे ओळखपत्र (ID Card) तयार करण्यात येतील व तयार झालेले ओळखपत्र (ID Card) प्रभाग समिती कार्यालयामार्फत पात्र फेरीवाल्यांना वितरीत करण्यात येणार आहेत.

सर्वेक्षणानुसार निश्चित करण्यात आलेल्या संबंधित फेरीवाल्यांनीही (पथविक्रेत्यांनीही) आपल्या प्रभाग समिती कार्यालयाशी संपर्क साधून ओळखपत्र मिळण्यासाठीची आवश्यक कागदपत्र वेळेत सादर करावीत व महानगरपालिकेस सहकार्य करावे, असे आवाहन महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे.